MHDH050001182024

दाखल दिनांक : २२.०१.२०२४
नोंदणी दिनांक : २२.०१.२०२४
निकाल दिनांक : २३.०३.२०२६
कालावधी : ०२ व. ०२ म. ०१ दि.

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, साक्री यांचे न्यायालय
## (पिठासीन अधिकारी मुग्धा एम. गांगुर्डे)

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२३/२०२४**
**निशाणी ३६**

नंदनी किशोर नाडेकर,
**वय : २२** वर्षे, **व्यवसाय :** घरकाम,
**राहणार :** सावरखेडा, पो.पानखेडा,
ता.साक्री, जि. धुळे. **...अर्जदार**

**विरुध्द**

१. फुलसिंग झामरु सोनवणे,
**वय :** २५ वर्षे, **व्यवसाय :** शेती,
२. इंदुबाई झामरु सोनवणे,
**वय :** ४७ वर्षे, **व्यवसाय :** घरकाम,
३. झामरु गंगाराम सोनवणे,
**वय :** ५७ वर्षे, **व्यवसाय :** शेती,
४. धनसिंग झामरु सोनवणे,
**वय :** ३० वर्षे, **व्यवसाय :** शेती,
५. अविता धनसिंग सोनवणे,
**वय :** २८ वर्षे, **व्यवसाय :** घरकाम,
६. भारती झामरु सोनवणे,
**वय :** २२ वर्षे, **व्यवसाय :** शिक्षण,
**वरील सर्व रा.:** रायकोट (पिंजारझाडी),
ता.साक्री, जि.धुळे. **...सामनेवाला**

---

**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ अन्वये विविध मागण्यांसाठी अर्ज**

---

**अर्जदारातर्फे : विधीज्ञ श्री.ए.बी.गायकवाड.**
**सामनेवालांतर्फे : विधिज्ञ श्री.एम.बी.साळुंके.**

---

**न्या य नि र्ण य**
**(पारित दिनांक २३ मार्च, २०२६)**

. अर्जदाराने **कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२** अन्वये विविध मागण्यांसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

२. **अर्जदारांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे**

अर्जदार व सामनेवाला क्र.१ चा विवाह रायकोट, ता.साक्री, जि.धुळे येथे झाला असून सामनेवाला क्र.२ आणि ३ हे अर्जदाराचे सासु–सासरे, सामनेवाला क्र.४ व ५ हे अर्जदाराचे जेठ–जेठाणी, सामनेवाला क्र.६ ही अर्जदाराची नणंद असून उभयतांना विवाह संबंधातून एकही अपत्य नसून त्यांचे विवाह संबंध अद्याप पावेतो कायम आहेत.

३. अर्जदाराचे पुढे कथन की, लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाला यांचेकडे नांदणेस आली असता काही दिवस तिला ब–यापैकी नांदविले. त्यानंतर सामनेवाला हे अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करु लागले. सामनेवाला क्र.२ ही अर्जदारास सतत टोचून बोलत असे की, 'तुझे आई वडील नंगचोट आहेत, भिकारी लोकांशी संबंध जुळलेला आहे.' सामनेवाला क्र.२ ते ६ हे अर्जदाराबाबत सामनेवाला क्र.१ यास खोटे नाटे सांगत असे की, 'ही घरातील कामधंदा करत नाहीत, उध्दटपणे बोलते, हिची वागणुक चांगली नाही' असे बोलून सामनेवाला क्र.१ याचे कान भरत असे. त्यांच्या चिथावनीला बळी पडून सामनेवाला क्र.१ हा अर्जदारास शुल्लक कारणाने बेदम मारहाण करित असे.

४. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला क्र.१ हा पदोपदी अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत असे. अर्जदार कोणाशी बोलली असता किंवा कोणाकडे बघीतले

असता 'तुझे आणि त्याचे लफडे आहे' असा संशय घेवुन अर्जदारास 'रांड, गधडी' असे गलीच्छ भाषेत शिवीगाळ करुन मारहाण करित असे. सामनेवाला क्र.२ ही सांगत असे की, 'हिची लायकी नव्हती घरात येण्याची माकड तोंडाची, तुझेमुळे आमच्या घराणेची ईज्त गेली.' सामनेवाला क्र.२ ते ६ हे अर्जदारास शिळे अन्न खायला देत असे. अर्जदाराच्या खाण्यापिण्याची आबाळ करित असे. तुला जास्त खायला लागते असे म्हणून जेवणाचे ताट हिसकावुन घेत असे.

५. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला हे अर्जदारास म्हणत असे की, 'तुझे आईवडीलांनी आम्हाला पाहिजे तेवढा हुंडा दिला नाही, भिकारडयासारखे लग्न लावुन दिले. लग्नात आम्हाला व आमच्या नातेवाईकांना काहीच मानपान दिला नाही. तसेच, मनासारखे लग्न काढून दिले नाही व लग्नात खर्च केला नाही. माझे मुलास काहीतरी मोठा व्यवसाय चालू करायचा आहे म्हणून तु तुझे माहेरुन व्यवसायासाठी रक्कम रुपये १,००,०००/–घेवुन ये.' त्यावेळी अर्जदाराने सामनेवाला यांना समजाविण्याचा प्रयत्न केला असता त्याचा राग येवुन सामनेवाला याने अर्जदारास बेदम मारहाण केली.

६. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला क्र.१ हा कधी कधी दारु पिवुन येत असे व अर्जदारास मारहाण करित असे. सामनेवाला हे अर्जदारास कांदे चाळ येथे कामाला घेवुन जात असे. त्यामुळे, काही दिवसानंतर अर्जदाराची तब्येत बिघडली असता सामनेवाला यांनी तिच्याकडे लक्ष दिले नाही. त्यानंतर, अर्जदार हिने फोन करुन सर्व हकीगत तिच्या वडीलांना सांगीतली. त्यानंतर अर्जदाराचे वडील आले व त्यांनी तिला पिंपळनेर येथील खाजगी दवाखान्यात नेले. त्यानंतर अर्जदार ही पुन्हा सामनेवाला यांच्याकडे आली असता सामनेवाला हे सतत तिला त्रास देत असे.

७. अर्जदाराचे पुढे कथन की, दिनांक २५.१२.२०२३ रोजी घरात स्वयंपाक व्यवस्थीत झाला नाही म्हणून सामनेवाला क्र.२ हिने अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाण केली. तसेच, सामनेवाला क्र.२ ते ६ हे अर्जदारास म्हणू लागले की, 'हिची मार

खायचीच लायकी आहे.' त्यानंतर, सायंकाळी सामनेवाला क्र.१ आल्यावर सामनेवाला क्र.२ ते ६ यांनी अर्जदाराबद्दल वाईट वाईट बोलून 'ही जास्त मातली आहे, हिला घरात राहू देवु नकोस' असे सांगून सामनेवाला क्र.१ याने अर्जदारास बेदम मारहाण करुन तिला घराच्या बाहेर काढून दिले.

८. अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवालांनी कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना स्वतःहून अर्जदारास मानसिक आणि शारिरीक छळ करुन तीचा त्याग केला आहे तसेच दरम्यानच्या काळात सामनेवालांनी अर्जदाराच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची आणि उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अर्जदार ही स्वतःचे पालन पोषण करण्यास असमर्थ आहे. उलटपक्षी सामनेवाला क्र.१ हा शेती/मजुरी काम करुन त्याच्यापासून त्यांना चांगले उत्पन्न मिळते. तसेच, सामनेवाला क्र.१ हा बाहेर राहून चांगले प्रकारे पैसे कमवितो. सामनेवाला क्र.१ याचेवर कोणतीही जबाबादारी नाही. त्यामुळे, सामनेवाला याने अर्जदारास दरमहा रक्कम रुपये १५,०००/–पोटगी मिळावी म्हणून अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दाखल केला.

९. सामनेवाला क्र.१ ते ६ यांनी **निशाणी २७** अन्वये म्हणणे दाखल करुन अर्जदारासोबतचे नातेसंबंध कबुल करुन अर्जातील उर्वरित सर्व कथन व आरोप विवेक्षितपणे नाकारले. उलटपक्षी सामनेवालांचा बचाव की, लग्नानंतर अर्जदार ही दोन महिनेपावेतो सामनेवाल्यांकडे एकत्र कुटुंबात राहिली. सामनेवाला क्र.१ यास नोकरी नव्हती म्हणून अर्जदाराचे सामनेवाल्यांचे एकत्र कुटुंबात चित्त लागत नव्हते. म्हणून, अर्जदार ही सामनेवाल्यास म्हणत असे की, 'मी एकत्र कुटुंबात राहणार नाही, मला तुमचे घरचे घरातील काम लावता, मला काम लावायचे नाही, मी तुमची नोकराणी नाही, माझे वडील हे मोठे पैसेवाले व मोठे पुढारी आहेत. तुम्ही माझे माहेरी चला, तिथेच माझेसोबत घरजावाई म्हणून रहा. तुम्ही जर माझेसोबत आला नाहीत तर मी तुमचा संसार करणार नाही' असे सांगत असे.

**१०.** सामनेवाला यांचा पुढे बचाव की, सामनेवाला हा बराचवेळा अर्जदारास समजावुन सांगत असे की, 'मी माझे म्हता–या आईवडीलांना सोडून तुझे माहेरी घरजावाई म्हणून येऊ शकत नाही.' परंतु, अर्जदार हिने ऐकले नाही. त्यानंतर सामनेवाल्यास नाईलाजाने अर्जदारासोबत सन २०२२ मध्ये अर्जदाराचे हट्टापायी सामनेवाला क्र.१ यास उमरे, ता.साक्री, जि.धुळे येथे शेतमजुर म्हणून तुटपुंज्या मानधनावर काम करु लागला. परंतु, त्याठिकाणी देखील अर्जदार हिचे मन लागले नाही. त्यामुळे, अर्जदार हिने माहेरी जाण्यासाठी हट्ट धरला व सामनेवाला यास काहीएक न विचारता अर्जदार हिने तिच्या वडीलांना बोलावुन वडीलांसोबत माहेरी निघून गेली.

**११.** सामनेवाला यांचा पुढे बचाव की, त्यानंतर, सामनेवाला हा अर्जदारास भेटण्यास व देवीच्या दर्शनास अर्जदारासोबत नानीस, ता.जि.रायगड येथे घेवुन गेला व देवदर्शनानंतर अर्जदार व सामनेवाला हे अर्जदाराच्या माहेरी गेले. तेथे सामनेवाला याने अर्जदारास परत उमरे येथे बोलावले असता अर्जदार ही सामनेवाला यास म्हणाली की, 'माझी तब्येत काही ठिक नाही, तु जा मी आली काही दिवसात.' त्यानंतर सामनेवाला क्र.१ हा नाईलाजाने कामासाठी निघून गेला. काही दिवसांनी सामनेवाला क्र.१ चे आई वडील हे अर्जदारास घेण्यासाठी तिचे माहेरी गेले असता अर्जदार हिने परत येण्यास नकार दिला व म्हणाली की, 'माझी मर्जी राहिल तेव्हा मी येईल, मी काही तुमची नोकराणी नाही की, तुमच्या घरी रायकोट येथे येवुन काम करु.'

**१२.** सामनेवाला यांचा पुढे बचाव की, त्यानंतर सामनेवाला क्र.१ याने अर्जदारास फोन केला असता अर्जदार म्हणाली की, 'तु मला विचारपुस करणाारा कोण, माझी मर्जी राहिल तर मी येईल, तुला पटत नसेल तर मला फारकती देवुन टाक.' त्यानंतर, काही दिवसांनी पुन्हा सामनेवाला क्र.१ याचे आईवडील अर्जदारास घेण्यासाठी तिच्या माहेरी आले असता अर्जदाराचे आईवडील म्हणू लागले की, 'तुम्ही पंचांना घेवुन या तेव्हाच आमची मुलगी तुमच्याकडे नांदण्यास येईल.' त्यानंतर, एक महिन्यांनी सामनेवाला व रायकोट गावाचे सरपंच व पोलीस पाटील यांना घेवुन

अर्जदाराच्या माहेरी गेले असता अर्जदाराचे वडील म्हणू लागले की, 'तुम्ही आमच्या मुलीला तुमच्या घरी मोलकरीण सारखे काम लावतात, आम्हाला आमच्या मुलीला पाठवायचे नाही, तुम्ही आम्हाला रक्कम रूपये ७,००,०००/–दया व आमच्या मुलीला फारकती देवून टाका.'

**१३.** सामनेवाला यांचा पुढे बचाव की, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदारास नांदायला आणण्यासाठी स्वत: व नातेवाईकांमार्फत बराच प्रयत्न केला. परंतु, अर्जदार ही नांदण्यास आली नाही. सामनेवाल्यांनी अर्जदाराचा कधीही कोणताही कौटुंबिक छळ केलेला नसून अर्जदार स्वतःहून माहेरी राहत आहे, सामनेवाला आजही अर्जदारासोबत विनाशर्त संसार करण्यास तयार आहे. सामनवोला क्र.१ यास कोणत्याही प्रकारची कायमस्वरुपी नोकरी नाही. सामनेवाला यांच्याकडे कुठलीही स्थावर व जंगम मालमत्ता नाही. सामनेवाला क्र.१ हा शेतमजुर म्हणून मौजे उमरे, ता.साक्री, जि.धुळे येथे काम करत आहे. सामनेवाला क्र.१ वर त्याच्या वयोवृध्द आई वडीलांच्या पालनपोषणाची व औषधोपचाराची जबाबदारी आहे. त्यामुळे, तो अर्जदारास स्वतंत्र खावटी देण्यास असमर्थ आहे. अर्जदाराने कोणतेही कारण नसतांना सामनेवाला क्र.१ याचा त्याग केलेला असल्यामुळे सामनेवाला हा अर्जदारास खावटी देणे लागत नाही. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

**१४.** अभिलेखावर आलेला दोन्ही बाजुंचे कथने, बचाव आणि साक्ष व दस्त पुरावा लक्षात घेता उचित निर्णयापर्यंत पोहचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात, सदर मुद्दयांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविण्यात आले ते खालीप्रमाणे –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | सामनेवाला क्र.१ ते ६ यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याची बाब अर्जदाराने सिध्द केली काय ? | **...होय** |
| **२.** | सामनेवाला क्र.१ याने कोणतेही संयुक्तीक कारणांशिवाय अर्जदाराचा सांभाळ करण्यास नकार दिल्याची बाब अर्जदाराने सिध्द केली काय ? | **...होय** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अर्जदार संरक्षणात्मक आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | **...होय** |
| ४. | अर्जदार ही सामनेवाला क्र.१ कडून अन्न, वस्त्र आणि औषधोपचारासाठी खावटी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय दरमहा रुपये ३,०००/–** |
| ५. | सामनेवालांकडून, शारिरीक, मानसिक आणि कौटुंबिक छळ झाला म्हणून नुकसान भरपाई मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय रक्कम रुपये २५,०००/–** |
| ७. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## पुरावा

**१५.** अर्जदाराने अर्जातील कथने व सामनेवालांविरुध्दचे आरोप शाबीत करण्यासाठी स्वतःला **निशाणी १२** अन्वये तपासले असून **निशाणी १५** अन्वये मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्र दाखल केले असून दस्त पुरावा म्हणून अर्जदाराने सामनेवाला क्र.३ यांचे नावे शेत मिळकत असल्याबाबतचे तीन ७/१२ उतारे व तीन गाव नमुना ८–अ उतारे **निशाणी १९ ते २४** अन्वये दाखल केले असून **निशाणी २५** अन्वये अर्जदाराने तिचा पुरावा बंद केला. अर्जदाराने तीच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये अर्जातील कथनाचा पुनरुच्चार केल्याचे दिसून येते. अर्जदाराचा सामनेवालातर्फे उलट तपास घेण्यात आला.

**१६.** उलट तपासादरम्यान अर्जदाराने मान्य व कबुल केले की, तिचे शिक्षण १२ वी झालेले असून तिला मराठी लिहिता वाचता येते व तिच्या अर्जाची माहिती तिने स्वत: विधिज्ञांना दिली होती, तिचे लग्न दिनांक ०२.०३.२०२२ रोजी झाले, मात्र सदरची बाब अर्जात का नमुद नाही याचे कारण ती सांगू शकत नाही, लग्नानंतर सामनेवाल्यांनी तिला फक्त एक ते दोन महिने चांगले वागविले, तिचेसोबत तिचे सासु–सासरे, पती, जेठ–जेठाणी आणि नणंद असे राहत होते, तिला झालेल्या कौटुंबीक

छळाबद्दल तिने पोलीस स्टेशनला तक्रार केली नव्हती व तिला सामनेवाल्यांनी मारहाण कधी केली त्याबाबत सांगता येणार नाही.

**१७.** उलट तपासादरम्यान अर्जदाराने पुढे मान्य व कबुल केले की, जेवणासाठी ते सर्व कुटुंब एकत्र बसायचे, आदिवासी रितीरिवाजाप्रमाणे मुलाकडील लोक, मुलीकडील लोकांना दहेज देतात हे माहिती नसल्याचे सांगीतले, सामनेवाल्यांनी मागणी कधी केली याबाबत तिला सांगता येणार नसून ती सासरी असतांना सामनेवाल्यांसोबत उमरे गावाला गेली, कामाला जात होती त्यावेळी लवकर उठुन जेवण बनवावे लागत होते, ती डिसेंबर २०२२ मध्ये कामाला गेली होती, ती कामावर असतांना आजारी पडल्याचा मजकुर तिचे शपथपत्रात का नमुद नाही याचे कारण ती सांगू शकत नाही व तिच्या वडीलांनी तिला सासरी केव्हा पोहचवले याची तारीख, वार नमुद नसून तिला देखील आठवत नाही, दिनांक २५.१२.२०२३ रोजीच्या घटनेबाबत तिने पोलीस स्टेशनला तक्रार दिली नव्हती. सामनेवालातर्फे विचारण्यात आलेले उर्वरित सर्व सुचक प्रश्न अर्जदाराने तंतोतंत नाकारले.

**१८.** अर्जदाराचे आरोप व कथने खोडून काढण्यासाठी सामनेवाला क्र.१ याने स्वतःला **निशाणी ३२** अन्वये तपासले असून **निशाणी ३४** अन्वये त्याचे मालमत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले असून **निशाणी ३५** अन्वये सामनेवाला यांनी त्यांचा पुरावा बंद केला. **निशाणी ३२** अन्वयेच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, सामनेवाला क्र.१ याने त्याच्या बचावाच्या कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. अर्जदारातर्फे सामनेवाला क्र.१ याचा उलट तपास घेण्यात आला.

**१९.** अर्जदारातर्फे उलट तपासादरम्यान सामनेवाला क्र.१ याने मान्य व कबुल केले की, त्याचे शिक्षण टी.वाय.बी.ए.पर्यंत झाले असून त्याचे एकत्रीत कुटुंब असून त्यांच्या कुटुंबात मोठा भाउ धनसिंग सोनवणे, वहिणी अबिता धनसिंग सोनवणे, बहिण भारती जामरु सोनवणे असे राहतात, त्याचे लग्न आदिवासी जातीरिवाजाप्रमाणे झाले

असून दहेजपाणी म्हणून अर्जदारास रक्कम रुपये ३५,०००/–दिल्याची तारीख त्याला आठवत नसून अर्जदार त्याला घरजावाई म्हणून त्याच्या सासरी जावे असे कधी म्हणाली त्याची तारीख त्याला आठवत नसून तो शेतीचे कामे आटोपुन कामाला निघून जायचा, असे कथन सामनेवाल्याने साक्षपुराव्यादरम्यान केले.

२०. अर्जदारातर्फे उलट तपासादरम्यान सामनेवाला क्र.१ याने मान्य व कबुल केले की, त्याच्या शपथपत्रातील मजकुर की, 'अर्जदाराने ऐकले नसल्यामुळे सामनेवाल्याला नाईलाजाने अर्जदारासोबत सन २०२२ मध्ये अर्जदाराच्या हट्टापायी सामनेवाल्यास उंभराणे, ता.साक्री, जि.धुळे येथे शेतमजुर म्हणून तुटपुंज्या मानधनावर काम करु लागला' हा मजकुर खोटा असल्याचे कथन केले, त्याला सकाळी कामाला जावे लागत असल्याने अर्जदार सकाळी लवकर उठायची, उपचारानंतर अर्जदारास पुन्हा त्याच्याकडे पोहचवुन दिले, त्यानंतर तिचे वडील आले व अर्जदारास घेवुन गेले, अर्जदाराला नांदविणेकामी तो, त्याची आई–वडील, सरपंच, पोलीस पाटील, गावातील कैलास राजु पवार, महारु भिका सोनवणे, दत्तु चैत्राम पवार, भु–या भिका सोनवणे, मानक्या दौलत पवार असे अर्जदाराच्या माहेरी सावरखेडा येथे गेल्याचे मान्य व कबुल केले, मात्र ते सावरखेडा येथे गेल्याची बाब ऐवजी ते पिंपळनेरला गेल्याची बाब चुकुन नमुद असल्याचे कथन केले.

२१. अर्जदारातर्फे उलट तपासादरम्यान सामनेवाला क्र.१ याने मान्य व कबुल केले की, अर्जदाराच्या घरी गेल्याची तारीख सांगता येणार नाही व सदर दिवशी पोलीस पाटील व सरपंच यांच्यासोबत आले होते याबाबत साक्षीदार म्हणून त्यांना तपासण्यास तयार असल्याचे मान्य व कबुल केले, **निशाणी १९ व २१** वरील ७/१२ उता–यावर सामनेवाला क्र.३ याचे नाव असून **निशाणी २०** वरील ७/१२ उता–यावर सामनेवाला क्र.३ व त्याचे काकाचे नाव असून उपरोक्त तिन्हीही मिळकतींमधून वार्षिक १० ते १२ लाख उत्पन्न मिळते, तसेच, पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.७ व ८ मधील

मजकुर खोटा असल्याचे मान्य व कबुल केले. तसेच अर्जदारातर्फे विचारण्यात आलेले उर्वरीत सुचक प्रश्न सामनेवाला क्र.१ याने तंतोतंत नाकारले.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता :**

२२. अर्जदाराचे कथन की, सामनेवाला क्र.१ ते ६ यांनी अर्जदाराचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करुन तीचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सांगितले. मात्र अर्जदाराने सामनेवाला क्र.१ याचा स्वत:हून त्याग केल्याचे अर्जदाराचे सर्व कथन खोटे असल्याचा सामनेवालातर्फे बचाव घेण्यात आला. उपरोक्त कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदाराने स्वत:स **निशाणी १२** अन्वये तसेच, सामनेवाला क्र.१ याने स्वत:स **निशाणी ३२** अन्वये तपासले. उभयंतांचा अभिलेखावर आलेला साक्ष पुरावा लक्षात घेता उभयंतांनी एकमेकांसोबतचे विवाह संबंध मान्य व कबुल केले. त्यामुळे, उभयंतांचे एकमेकांसोबत झालेला विवाह हा वादातीत नाही.

२३. उपरोक्त अभिलेखावर आलेला दोन्ही बाजुंचा साक्ष पुरावा लक्षात घेता असे दिसून येते की, अर्जदाराने उलट तपासादरम्यान मान्य व कबुल केले की, सामनेवाल्यांनी तिला फक्त एक ते दोन महिने चांगले वागविले, ती सासरी असतांना सामनेवाल्यांसोबत उंभरेला कामाला गेली होती, ती डिसेंबर २०२२ मध्ये कामाला गेली होती, ती आजारी असतांना तिचे वडील तिला घेण्यास सासरी आले व तिला झालेल्या कौटुंबीक छळाबाबत तिने कोठेही पोलीस स्टेशनला तक्रार केली नसल्याचे मान्य व कबुल केले. सामनेवाल्यांतर्फे त्यांच्या बचावाच्या पृष्ठयर्थ अनेक सुचक प्रश्नांना अर्जदाराने तंतोतंत नाकारले असून अर्जदार तिच्या साक्षपुराव्यावर ठाम राहिली असल्याचे दिसून येत आहे.

२४. सामनेवाला क्र.१ याने उलट तपासादरम्यान मान्य व कबुल केले की, अर्जदाराने त्याला घरजावाई म्हणून त्याचे सासरी जाण्यास सांगीतल्याची तारीख त्याला सांगता येणार नसून तो शेतीचे काम आटोपुन कामाला निघून जायचा,तो सकाळी

कामाला जात असल्याने अर्जदार सकाळी लवकर उठायची, उपचारानंतर अर्जदारास त्याच्याकडे पोहचवुन दिले व त्यानंतर तिचे वडील आले व अर्जदारास घेवुन गेले, अर्जदाराला नांदविणेकामी त्याचे आई वडील, पोलीस पाटील, सरपंच व गावातील चार ते पाच लोक तिला घ्यायला गेले, मात्र, अर्जदाराच्या घरी गेल्याची तारीख त्याला सांगता येणार नाही, तसेच, पोलीस पाटील व सरपंच त्यांच्यासोबत अर्जदारास घेण्यास गेल्याची बाब सिध्द करणेकामी सामनेवाला त्यांना साक्षीदार म्हणून तपासण्यास तयार आहे, मात्र, अभिलेखाचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, सामनेवाला क्र.१ याने स्वत: व्यतिरिक्त इतर स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही.

२५. तसेच, सामनेवाला क्र.१ याने उलटतपासादरम्यान मान्य व कबुल केले की, त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.७, ८ व अधोरेखांकीत भाग–अ खोटा असल्याचे मान्य व कबुल केले. उपरोक्त सामनेवाला क्र.१ च्या साक्ष पुराव्यावरुन सामनेवाला क्र.१ चा साक्षपुरावा ग्राहय धरावा की नाही याबद्दल देखील शंका निर्माण होत आहे.

२६. अर्जदाराने उलटतपासादरम्यान ठामपणे सांगीतले की, सामनेवाल्यांनी तिला फक्त एक ते दोन महिने चांगले नांदविले, यावरुन असे दिसून येते की, सामनेवाल्यांनी उपरोक्त कालावधीनंतर अर्जदारास त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच, सामनेवाल्यांनी अर्जदारास कोणताही त्रास दिला नसल्याचा बचाव सामनेवाल्यांनी ठोस पुराव्यानिशी अभिलेखावर शाबित केलेला नाही. उलटपक्षी, सामनेवाला क्र.१ याने त्याच्या साक्ष पुराव्यातील काही भाग खोटा असल्याचे मान्य व कबुल केले असल्याने सामनेवाला क्र.१ याचा साक्ष पुराव्यावर किती अवलंबून रहायचे याबाबत शंका निर्माण होत आहे. त्यामुळे, सामनेवाल्याने अर्जदाराचा कौटुंबीक हिंसाचार केल्याची बाब अभिलेखावर आली असल्याचे दिसून येते. परिणामी, **<u>मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी</u>** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता :</u>**

२७. अर्जदाराचे पुढे कथन की, कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना सामनेवालांनी अर्जदारास टाकून घातले आहे. मात्र, सामनेवाल्यांनी बचाव घेतला की, अर्जदार हिने सामनेवाला क्र.१ यास कुठलेही संयुक्तीक कारणाशिवाय टाकून घातले असून त्याचा स्वत:हून त्याग केलेला आहे. ज्याअर्थी सामनेवाल्याचा बचाव की, अर्जदाराने त्याला कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना टाकून घातले असून त्याचा स्वत:हून त्याग केलेला आहे, त्याअर्थी सामनेवाल्याने अर्जदारास नांदविणेकामी काय पावले उचलली व काय प्रयत्न केले हे बघणे देखील गरजेचे आहे. सामनेवाल्याचा बचाव लक्षात घेता सामनेवाल्याने अर्जदारास नांदविणेसाठी प्रयत्न केले अथवा काही कायदेशिर कारवाई केली असल्याचे अभिलेखावर दिसून येत नाही. उलटपक्षी, उलटतपासादरम्यान सामनेवाला क्र.१ याने मान्य व कबुल केले की, अर्जदाराचे वडील आले व अर्जदारास घेवुन गेले व अर्जदारास नांदविणेकामी सामनेवाल्याचे आईवडील, पोलीस पाटील, सरपंच व इतर सात ते आठ लोक अर्जदाराच्या घरी गेल्याची बाब सिध्द करणेकामी तो पोलीस पाटील व सरपंच यांना तपासण्यास तयार आहे. मात्र, अभिलेखाचे अवलोकनार्थ सामनेवाला क्र.१ याने स्वत: व्यतिरिक्त इतर कोणालाही स्वतंत्र साक्षीदार म्हणून तपासलेले नाही.

२८. याठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, सामनेवाला क्र.१ याने अर्जदारास टाकून घातले असल्याने अर्जदार तिचे माहेरी नाईलाजास्तव रहावे लागत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सामनेवाल्याने तिला नांदविणेकामी काही प्रयत्न व कारवाई केली नसल्याचे अभिलेखावर दिसून येत असल्यामुळे सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराचा सांभाळ करण्याचा नकार दिल्याची बाब अभिलेखावर दिसून येत आहे. परिणामी, **<u>मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी</u>** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता</u> :**

**२९.** अर्जदाराच्या साक्ष पुराव्यावरुन असे दिसून येते की, सामनेवालांनी अर्जदाराचा वेळोवेळी कौटुंबिक हिंसाचार करुन शारिरीक आणि मानसिक छळ केला. सदरच्या हिंसाचाराच्या घटना पुन्हा होणे नाकारता येत नाही. त्यामुळे सदर कौटुंबिक हिंसाचाराची पुनरावृत्ती टाळण्यासाठी अर्जदाराच्या हक्कांमध्ये व तीच्या संरक्षाणाकरीता आदेश पारित करणे न्यायिकदृष्ट्या योग्य व उचित वाटते. म्हणून **<u>मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी</u>** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ करीता :</u>**

**३०.** अर्जदाराचे पुढे कथन की, सामनेवाला क्र.१ हा शेती/मजुरी करुन त्यापासून त्याला चांगले उत्पन्न मिळते. तसेच, सामनेवाला क्र.१ हा बाहेर राहून चांगले प्रकारे पैसे कमवितो. उलटपक्षी, सामनेवाला क्र.१ याचा बचाव की, तो शेतमजुर म्हणून उमरे येथे काम करित आहे. उपरोक्त कथनांच्या पृष्ठयर्थ अर्जदाराने सामनेवाला क्र.३ यांचे नावे असलेले तीन ७/१२ उतारे **निशाणी १९ ते २१** अन्वये अभिलेखावर दाखल केलेल असून सामनेवाला क्र.१ याने उलटतपासादरम्यान मान्य व कबुल केले की, सदरचे तिन्हीही उतारे त्याच्या वडीलांच्या नावे असून तो शेतीचे काम आटोपुन कामाला निघून जायचा, तसेच, **निशाणी १९ ते २१** अन्वयेच्या ७/१२ उता–यावरील तिन्हीही मिळकतीतुन सामनेवाला यास दहा ते बारा लाख उत्पन्न मिळाल्याची बाब सामनेवाला क्र.१ याने मान्य व कबुल केली.

**३१.** उपरोक्त उलटतपासादरम्यान अभिलेखावर आलेला दोन्ही पक्षाचा साक्ष पुरावा न्यायीक तराजुत तोलल्यास व मोजल्यास असे दिसून येते की, सामनेवाला क्र.१ यास शेती व्यवसायापासून उत्पन्न असल्याचा बचाव अर्जदाराने यशस्वीरित्या अभिलेखावर आणला.

**३२.** उपरोक्त अभिलेखावर आलेला एकंदरीत साक्ष पुरावा लक्षात घेता सामनेवाला क्र.१ यास उत्पन्न असल्याची बाब अर्जदाराने यशस्वीरित्या सिध्द केली

असल्याने व सामनेवाला क्र.१ याने अर्जदारास सांभाळण्याची दुर्लक्षीत केल्याची बाब अर्जदाराने यशस्वीरित्या सिध्द केल्याने अर्जदार ही सामनेवाला क्र.१ कडून खावटी मिळण्यास पात्र आहे. उपलब्ध साक्ष तसेच दस्त पुरावा आणि अर्जदाराच्या गरजांचा आणि सद्यःपरिस्थितीत जिवनावश्यक वस्तूंच्या किंमती व सामनेवाला क्र.१ याचे उत्पन्न पाहता, अर्जदार ही सामनेवाला क्र.१ याच्याकडून खावटीपोटी दरमहा रक्कम रुपये ३,०००/– (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) खावटी देण्याचा आदेश पारित करणे न्यायिक, उचित व क्रमप्राप्त होईल. म्हणून **मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष अंशतः होकरार्थी नोंदवित** आहे.

**मुद्दा क्रमांक ५ करीता :**

**३३.** अर्जदाराने तीला झालेल्या शारिरीक, मानसिक व कौटुंबिक छळापोटी रक्कम रुपये ३,००,०००/– नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केली. मुद्दा क्र.१ बाबत विवेचन करतांना सामनेवालांनी अर्जदाराचा वेळोवेळी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अभिलेखावर आलेले आहे. सदर कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना विचारात घेता साहजिकच अर्जदाराला शारिरीक, मानसिक, भावनिक आणि कौटुंबिक त्रासाला सामोरे जावे लागले असल्याची बाब नाकारता येत नाही. त्यामुळे अर्जदार ही नुकसान भरपाई मिळण्यास पात्र ठरते. सदर नुकसान भरपाई देत असतांना सामनेवाला क्र.१ याच्या उत्पन्नाबाबत अभिलेखावर ठोस पुरावा आलेला आहे. त्यामुळे, सामनेवाला क्र.१ याने, अर्जदारास रक्कम रुपये २५,०००/– (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) नुकसान भरपाई देणे न्यायिकदृष्ट्या योग्य व उचित वाटते. उपरोक्त चर्चेच्या आधारावर **मुद्दा क्र.५ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित** आहे.

**मुद्दा क्र.६ करीता :**

**३४.** एकंदरीत अभिलेखावर दोन्ही बाजुंचा आलेला साक्ष पुरावा आणि दस्त पुरावा, न्यायिक तराजूत तोलल्यास व मोजल्यास अर्जदाराच्या साक्ष पुराव्यास अधिक

महत्व प्राप्त होते. तसेच उपरोक्त केलेल्या चर्चेच्या आधारावर परिणामी **मुद्दा क्र.६** च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

**१.** अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

**२.** सामनेवाला क्र.१ यास आदेश देण्यात येतो की, त्याने अर्जदारास अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये ३,०००/– (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) उदरनिर्वाह आणि औषधोपचारासाठी पोटगी द्यावी.

**३.** सामनेवाला क्र.१ यास आदेशित करण्यात येते की, शारिरीक, मानसिक आणि कौटुंबिक छळापोटी नुकसान भरपाई म्हणून अर्जदारास रक्कम रुपये २५,०००/– (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) प्रस्तुत आदेश पारित झाल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत द्यावे.

**४.** सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराला प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये ५,०००/– (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) स्वतंत्र द्यावे.

**५.** सामनेवाला क्र.१ ते ६ यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी स्वतः अगर ति–हाईत इसमांतर्फे अर्जदारांचा कौटुंबिक हिंसाचार करु नये व त्याकरीता सामनेवाला क्र.१ ते ६ यांनी प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/–(अक्षरी रुपये पाच हजार मात्र) चे बंधपत्र द्यावे.

**६.** प्रस्तुत आदेशाच्या प्रती संरक्षण अधिकारी आणि संबंधीत पोलीस स्टेशन, यांना माहितीस्तव व कार्यवाहीकरीता पाठविण्यात याव्यात.

**७.** प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार आणि सामनेवाला क्र.१ यांना विनामुल्य देण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येत आहे.)**

MUGDHA MUKUND GANGURDE
Digitally signed by MUGDHA MUKUND GANGURDE
Date: 2026.03.24 17:33:57 +0530

साक्री. **(मुग्धा एम. गांगुर्डे)**
दिनांक : २३.०३.२०२६. **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, साक्री.**